**MHST160004122002**

## नि.दि.मु.क्र. २०/२००२ मधील नि. १४७ वरील आदेश

(हणमंत आनंदराव थोरवे व. वि. महादेव कोंडीबा थोरवे व.)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १० व ११अ ते ११ड यांनी दावा मिळकत अन्य कोणालाही तबदिल करु नये तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा बोजा निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त ताकिद त्यांना देण्यात यावी याकरीता दाखल केला आहे.

वादीचे अर्जातील कथन खालीलप्रमाणे असे आहे की,

२. वादीने सदरचा दावा हा दावा मिळकत त्याची एकमेव मालकीची आहे तसेच वादीने प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी मयत प्रतिवादी क्र. १ याचेशी संगनमत करुन दि. १८/०२/२००४ रोजीचा तयार केलेला दस्त बनावट असून तो वादीवर बंधनकारक नाही असा जाहीर ठराव करुन मिळणेकामी दाखल केला आहे. तसेच वादीने प्रतिवादी क्र. ९ ते ११ व मयत प्रतिवादी क्र. १ यांनी स्वतः अगर इतरांमार्फत वादीचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये म्हणून निरंतर ताकिदीची मागणी केली आहे. वादीने दावा मिळकतीमध्ये अनेक सुविधा केल्या असून त्यासाठी त्याने बराच खर्च केला आहे. प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी दि. १८/०२/२००४ रोजीच्या पोकळ दस्तावरुन दावा मिळकतीला त्यांच्या नावाची नोंद करुन घेतली आहे. परंतू प्रत्यक्षात दावा मिळकत केव्हाही त्यांच्या कब्जात नव्हती व नाही. प्रतिवादी क्र. ११ मरण पावल्यानंतर तिचे वारस प्रतिवादी क्र. ११अ ते ११ड यांनी त्यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीचे सातबारा रेकॉर्ड सदरी करुन घेतली आहे.

३. वादीचे पुढे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १० व ११अ ते ११ड हे दावा मिळकतीस असलेल्या त्यांच्या नावाच्या नोंदीचा गैरफायदा घेवून दावा मिळकत तबदिल व विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याची माहिती वादीला मिळाली आहे. दावा मिळकत

तबदिल झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. दाव्याचा अंतिम निर्णय होण्यास बराच कालावधी जाणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १० व ११अ ते ११ड यांनी दावा मिळकत कोणालाही व कोणत्याही प्रकारे तबदिल करु नये तसेच दावा मिळकतीवर कोणत्याही प्रकारे बोजा निर्माण करु नये अशी त्यांना तुर्तातुर्त ताकिद देण्यात यावी अशी विनंती वादीने केली आहे.

४. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र. १० व ११अ ते ११ड यांनी नि. १५२ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, वादीने प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या विरुद्ध निरंतर ताकिदीची मागणी केली असून त्यांचे विरुद्ध दिलेले तुर्तातुर्त ताकिदीचे अर्ज हे कधीही चालवलेले नाही. त्याचप्रमाणे वादीने मूळ दाव्यात दावा मिळकती प्रतिवादींनी विकू नये अशी निरंततर ताकिद मागितलेली नसल्याने प्रस्तूतचा अर्ज कायद्याने चालू शकत नाही. तसेच सदर अर्ज देण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. वादीने खोटया कथनांचा दावा केलेला असून तो प्रतिवादींना मान्य व कबुल नाही. त्यांचे असे म्हणणे आहे की, दि. १८/०८/२००४ चा दस्त पोकळीस्त व बनावट नसून त्या नोंदीबाबत वादींनी कोठेही कधीही तक्रार केलेली नव्हती. कायद्यानुसार प्रत्येकी १/३ हिश्यापेक्षा जास्त क्षेत्र वाटपाने प्रतिवादी क्र. १० व ११ ला येत असल्याने ते मिळणेसाठी त्यांनी काउंन्टर क्लेम दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. १० व ११ यांना आपल्या वडिलांकडून वडिलार्जीत मिळकतीचा हिस्सा मिळालेला आहे व तो ते वाटून मागत आहेत. त्यामुळे कायद्यानुसार सहहिस्सेदारा विरुद्ध कोणतीही ताकिद मागणेचा अधिकार वादींना नाही. प्रतिवादी क्र. ११ ही मयत झाली असून प्रतिवादी क्र. १० ही वयोवृदध आहे व त्यांचे हक्क मिळणेसाठी दाव्याचे कामकाज तातडीने चालवणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीने दाव्याचे कामकाम लांबवण्यासाठी दिलेला प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

५. दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तूतचा अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले.

६. खालील मुद्दे विचारार्थ उद्भवत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण आहे काय? | नाही |
| २. | वादीच्या बाजुने सोईचा समतोल आहे काय? | नाही |
| ३. | वादीच्या बाजुने तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास त्यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल काय? | नाही |
| ४. | काय आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ ते ३ करीता:–

७. सदर मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने ते एकत्रात विचारात घेतले आहेत. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १०, ११अ ते ११ड हे दावा मिळकतीस असलेल्या त्यांच्या नावाचा गैरफायदा घेवून दावा मिळकत तबदिल व विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याची खात्रीशीर माहिती वादीस मिळालेली आहे. अशा परिस्थीतीत दावा मिळकत तबदिल झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. म्हणून सदर प्रतिवादीं विरुद्ध त्यांनी दावा मिळकत तबदिल करु नये अथवा त्याच्यावर बोजा निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त ताकिद देण्यात यावी अशी विनंती वादीने केली आहे. याउलट प्रतिवादी क्र. १०, ११अ ते ११ड यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी आजपावेतो दावा मिळकत विकलेली नाही परंतू त्यांना दावा मिळकतीचा हिस्सा त्यांचे वडीलांकडून मिळाला असून सदर हिस्सा विकण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. त्याचप्रमाणे वादींनी दाव्यात प्रतिवादींनी दावा मिळकत विकू नये याबाबतची कोणतीही मागणी केलेली नसल्याने सदरचा अर्ज कायद्याने चालू शकत नाही.

८. वादी प्रतिवादीं विरुद्ध तुर्तातुत ताकिदीची मागणी करत आहेत. त्याकरीता वादीला त्याचे बाजूने प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे सिध्द करणे गरजेचे आहे. वादीची

अर्जातील मागणी विचारात घेता वादीने प्रथमदर्शनी हे दाखवून देणे गरजेचे आहे की, प्रतिवादी क्र. १०, ११अ ते ११ड हे दावा मिळकत ति–हाईत इसमास तबदिल करत आहेत किंवा तबदिल करण्याचा प्रयत्न करत आहेत तसेच त्यावर बोजा निर्माण करत आहेत. त्याचप्रामणे वादीने हे सिध्द करणे गरजेचे आहे की, दावा मिळकत तबदिल झाल्यास त्याचे कधीनी न भरुन येणारे नुकसान होणार आहे. वादी व प्रतिवादी यांची कथने विचारात घेता तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा मिळकतीस प्रतिवादी क्र. १० व ११ तसेच वादी यांची प्रत्येकी ८ आणे हिश्याची नोंद आहे. प्रतिवादी क्र. ११अ ते ११ड हे प्रतिवादी क्र. ११ चे वारस आहेत व त्यांच्याही नोंदी दावा मिळकतीस असल्याचे वादीने मान्य केले आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, दावा मिळकत ही त्याचे वडीलांची स्वकाष्टार्जीत असून ती त्याचे एकटयाचे मालकीची आहे. या उलट प्रतिवादी क्र. १० व ११ यांचे असे म्हणणे आहे की, सदर मिळकत ही त्यांची वडीलोपार्जित असून त्यांचा सदर मिळकतीमध्ये १/३ हिस्सा आहे व तो हिस्सा मिळण्याकरीता प्रतिवादींनी सदर प्रकरणात विरुद्ध दावा दाखल केला आहे. सबब उभयपक्षकार हे दावा मिळकतीत त्यांचा हक्क व अधिकार असल्याचे कथन करत आहेत. उभयपक्षकारांची कथने ही पुराव्याचा भाग असून सद्यस्थीतीत प्रस्तूत अर्जाचे कामी ती गृहित धरणे योग्य होणार नाही.

९. अभिलेखावरुन असे दिसून येते की, वादींनी दावा दाखल करतेवेळी दाखल केलेला तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज चालवलेला नाही. तसेच सदर प्रकरणात मुद्दे निश्चित करण्यात आले असून अंशतः पुरावा नोंदवण्यात आलेला आहे. दावा मिळकतीस वादी व प्रतिवादी क्र. १० व ११ यांच्या नोंदी अनेक वर्षांपासून आहेत. तसेच वादीने आव्हानित केलेला वाटणीपत्राचा दस्त हा दि. १८/०८/२००४ रोजीचा आहे. अद्याप सदर नोंदी व दस्ताच्या आधारे प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी तसेच प्रतिवादी क्र. ११ मयत झाल्यानंतर तिचे वारसांनी वाद मिळकत ही ति–हाईत इसमास विक्री केली आहे अथवा त्यावर बोजा निर्माण केला आहे याबाबतचा कोणताही पुरावा वादीने सादर केलेला नाही. वादीचे केवळ असे म्हणणे आहे की, सदर प्रतिवादी हे दावा मिळकत तबदिल व विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याची खात्रीशीर माहिती त्याला मिळाली आहे. परंतू सदर माहिती त्याला कशाच्या आधारे मिळाली व कोणी दिली याबाबतचा पुरावा वादीने सादर

केलेला नाही. तसेच वादीने सदर प्रतिवादी हे दावा मिळकत विकण्याच्या तयारीत आहेत याबाबतचा कोणताही जाहीरनामा अथवा वर्तमानपत्रातील जाहीर निवेदन अथवा साक्षीदारांचे पुरावे सादर केलेले नाहीत. अशा परिस्थीतीत केवळ खात्रीशीर माहिती मिळाली म्हणून प्रतिवादी क्र. १० व ११अ ते ११ड हे दावा मिळकत विक्री अथवा तबदिल करत आहेत असे गृहित धरणे योग्य होणार नाही.

१०. एकंदरीत उपरोक्त विवेचन विचारात घेता वादी प्रथमदर्शनी हे सिध्द करण्यास असफल ठरला आहे की, प्रतिवादी क्र. १० व ११अ ते ११ड हे दावा मिळकत विक्री अथवा तबदिल करत आहेत तसेच त्यावर बोजा निर्माण करत आहेत. त्यामुळे सोयीचा समतोल हा वादीच्या बाजूने नाही. तसेच तुर्तातुर्त ताकिद न दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणून मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे. सबब मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष विचारात घेता मुद्दा क्र. ४ चे निष्कर्षार्थ खालील आदेश पारीत करत आहे.

**:: आ दे श ::**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

ठिकाण – वाई. (एस. आर. भोर)
दिनांक – २७/११/२०२१ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, वाई.

**प्रमाणपत्र**

यान्द्वारे मी असे प्रतिपादन करते की, वरील आदेश व त्याची तयार केलेली पी.डी.एफ. प्रत यातील सर्व मजकूर मूळ न्यायनिर्णयाशी तंतोतंत बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| आदेश दिनांक | : | २७.११.२०२१ |
| आदेश स्वाक्षांकित दिनांक | : | २७.११.२०२१ |
| लघुलेखकाचे नाव | : | सौ.एस.एस.कुंभार.लघुलेखिका(श्रेणी ३) |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांक | : | २७.११.२०२१ |